# जनावरातील धनुर्वात लक्षणे व उपाय

डॉ. अतुल मुराई
प्राचार्य

डॉ. नेहा काळे
सहाय्यक प्राध्यापिका

जयश्री गुठाळे
अंतिम वर्ष विद्यार्थिनी

कृषि महाविद्यालय, आचलोळी, महाड, डॉ. बा. सा. कों. कृ. वि., दापोली

सध्या जनारावामध्ये विविध प्रकारचे आजाराचा प्रादुर्भाव दिसत आहेत. त्यात कासदाह, लंपी स्कीन डिसीज, धनुर्वात, जनावरातील डेंग्यु अशा विविध प्रकारांच्या आजारांनी पशूपालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरत आहे. परंतु जनावरांची व्यवस्थित काळजी घेतली व स्वच्छता ठेवून व्यवस्थित निगा ठेवली तर बऱ्याचशा प्रमाणात आजारांचे होणारे प्रमाण कमी होऊ शकते. जनावारांना होणारा धनुर्वात हा कोणत्या कारणामुळे होतो? त्याची लक्षणे व त्यावरील उपाय याविषयीची माहिती या लेखात आपण घेणार आहोत. बहुतांशी जनावरांच्या शरीरावर होणाऱ्या जखमामधून धनुर्वात आजाराचा जिवाणू जनावरांच्या शरीरात प्रवेश करतो. ऑक्सिजनच्या अनुपस्थितीत हे जिवाणू रुजल्याने मोठ्या संख्येने क्लोस्ट्रीडियम टीटनी जिवाणू तयार करण्याचे काम करतात. जनावरांमध्ये कमीत कमी दोन ते तीन दिवस व जास्तीत जास्त चार आठवड्यात धनुर्वाताची लक्षणे दिसण्यात सुरवात होते.

## धनुर्वात प्रादुर्भावाची कारणे:

- बऱ्याचदा जनावरांना नांगर लागल्याने, एखादा प्राणी चावल्याने किंवा एखादी टोकदार वस्तू लागल्याने जनावराच्या पायाला, पोटाला जखमा होतात, अशा जखमा मातीच्या सानिध्यात आल्या तर धनुर्वाताची लागण होऊ शकते.
- नवजात वासरे, करडे यांच्या नाळेला जर जंतुसंसर्ग झाला तर जखम तयार होऊन किंवा जनावरांमध्ये विविध आजाराकरिता केलेल्या शस्त्रक्रिया यामुळे होणाऱ्या जखमांना संसर्ग होऊन मातीसोबत संपर्क येतो.
- जनावरांच्या शरीरावरील जखमांचे वेळीच योग्य उपचार न केल्याने त्या जखमेतून रक्तमिश्रित पु बाहेर येण्यास सुरवात होते. त्यामुळे जखमेतील पेशी कमकुवत होतात. या जखमी पेशी क्लोस्ट्रीडियम टीटनी बिशानुशी संपर्क आल्याने लगेच या जीवाणूचा शरीरात शिरकाव होतो. प्रथम जखमी पेशीमध्ये हे बीजाणू रुजतात आणि जीवाणूची संख्या वाढून विष तयार होण्यास सुरवात होते. ह्यामुळे विशेष शारीरिक हालचाल व इतर कार्य अनियंत्रित होते.
- बाधित जनावरला अर्धांग वायूचे झटके येण्यास सुरवात होते. तोंड व शोषण संस्थेसंबंधित स्नायू ताठर व बद्ध होण्याने अखेरीस जनावराचा तडफडून मृत्यू होतो.

## धनुर्वाताची लक्षणे:

- धनुर्वाताच्या सुरवातीला जनावरांचे शारीरिक तापमान सामान्य असते. चारा खाण्याकडे अंशत: दुर्लक्ष करतात.
- अर्धांगवायूचा झटका येणाच्या अखेरीस शारीरिक तापमान ४२-४३° से. वाढते.
- तीव्र शारीरिक हालचाल होते, शरीर ताठ होऊन येतात. जनावर उजेड, आवाज किंवा स्पर्शाला अतिवेगाने प्रतिसाद देतात.
- प्रथम तोंडाच्या स्नायूंना अर्धांगवायूचा झटका येतो. दातखिळी बसते त्यामुळेच मान, पाठ व पायाच्या भागातील स्नायू ताठर होतात. शरीर लाकडासारखे कडक होते.
- शरीरातील श्वसन व रक्तभिसरण संस्थाच्या स्नायूची हालचाल अनियंत्रित झाल्याने या दोन्ही संस्थाचे कार्य बिघडून जनावरांना श्वास घेताना त्रास होतो.
- रक्तदाब कमी जास्त होऊन श्वसन संस्थाच्या अवयवांना अर्धांगवायूचा झटका येऊन साधारणपणे एक आठवड्याच्या आत जनावराचा मृत्यू होतो.

## जनावरांमधील धनुर्वाताचे निदान:

- जनावरांना जखमा असतील किंवा जखमा झाल्यास पूर्वइतिहास असल्यास धनुर्वात रोगाच्या लक्षणावरून लवकर निदान करता येते. योग्य उपचाराकरिता धनुर्वाताचे प्रयोगशाळेत अचूक निदान करता येते. यामध्ये रक्तद्रव्यामध्ये विषाची ओळख आणि त्याची पातळी यांची तपासणी करावी लागते. जखमेच्या नमुन्यामधून जिवाणू प्रयोगशाळेत वेगळे करून क्लोस्ट्रीडियम टीटनी ओळख पटवता येते.

## जनावरांमधील धनुर्वातावरील उपचार आणि नियंत्रण:

- जनावरांना धनुर्वात झाल्यास मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक आहे. परंतु योग्य निदान केले गेल्यास पशुवैद्यकीय सल्ल्याने जनावरांच्या शरीरावरील जखम प्रतिजैविकांच्या द्रावणाने स्वच्छ कराव्यात. पशुतज्ज्ञांकडून प्रतिजैविक टोचून घ्यावी. जनावराच्या स्नांयूना आराम मिळणारी वेदनाशामक ओषधे दिल्यास आजारातुन बरे होण्यास मदत होते.
- जनावरांना लसीकरण हाच प्रभावी उपाय आहे. टिटॅनस टॉस कॉइड लस जनावरांना पशुवैद्यकामार्फत एकदाच दिल्याने धनुर्वात विरोधात रोगप्रतिकारशक्ती वाढते. नवजात वासरांना व करडांना स्वच्छ जागेत ठेवावे. शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या जनावरांची विशेष काळजी घ्यावी.

(संपर्क: +९१ ८९७७६३४४४३
+९१ ८२०८८२६९४२)

★ ★ ★